## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक १८/०५/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.३५/२०११/जा.४१७, दि.२०/०५/२०११, ०३/०६/२०११, १०/०६/२०११, २३/०६/२०११, ०४/०७/२०११, ११/०८/२०११, २४/०८/२०११, ०३/०९/२०११ व १५/०९/२०११.

३) ॲक्टीव्हा स्कूटी क्र.एमएच-०४-डीव्ही-५४१ चे मालक कैलाश लक्ष्मणगिरी गोस्वामी, ॲक्टीव्हा स्कूटी क्र.एमएच-०४-डीपी-६५२६ चे मालक दिपक लक्ष्मणगिरी गोस्वामी, लक्ष्मणगिरी मंगलगिरी गोस्वामी तसेच हनीफ खान यांचे दि.०९/०६/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदन.

४) बस क्र.आरजे-३०-पीए-०९९९ तसेच श्रीनाथ ट्रॅव्हल्सचे मालक सुशिलकुमार जोशी, बुकींग क्लार्क नरेंद्रकुमार मागीलाल तेली (कुमार) व बस क्रमांक आरजे-३०-पीए-०९९९ चे चालक रतनलाल मोतीलील जाट यांचे दि. ०६/०८/२०११ रोजीचे टपालामार्फत सादर केलेले स्वतंत्र लेखी निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.३५/२०११/जा. ९५५
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक :- २४/११/२०११

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक ०७/०५/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या भरारी पथकातील अधिकारी पंचासह दुपारी ठिक १२:३० वाजता एकत्रितपणे पायी चालत येऊन तेथून जवळच असलेल्या श्लोका हॉटेलच्या समोर, एल.बी.एस. रोड, मुलूंड (प) मुंबई या ठिकाणी पोहचले असता, सदर ठिकाणी श्लोका हॉटेलच्या समोर मुंबईच्या दिशेने एक प्रवाशी वाहतूक करणारी बस उभी होती. सदर बसच्या समोरील काचेवर नविन श्रीनाथ ट्रॅव्हल्स असे इंग्रजीमध्ये लिहिलेले असून बसचा क्रमांक आरजे-३०-पीए-०९९९ असा असल्याचे दिसून आले. तसेच बसच्या समोर ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीव्ही-५४१ उभी होती. अधिकारी यांनी पंचासह बसमध्ये प्रवेश केला असता, बसमध्ये तीन इसम उपस्थित होते व त्यांच्या बाजूलाच एका प्लास्टीकच्या गोणीमध्ये २० लिटर्स क्षमतेचे काळ्या रंगाचे प्लास्टीकचे कॅन असल्याचे व स्लिपर कोचवरील गादी वरती केल्याची व आतील बाजुचे इंधन टाकीमध्ये प्लास्टीकच्या पाईपला जोडलेले लोखंडी नरसाळे लावल्याचे

दिसून आले. बसमध्ये उपस्थित इसमास त्याचे नाव गांव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव नरेंद्रकुमार मांगीलाल तेली (कुमार), रतनलाल मोतीलाल जाट व हानीफ अशी असल्याचे सांगीतले.

त्याचवेळेस बसच्या समोर आणखी एक ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीपी-६५२६ वरुन एक इसम आला व त्याच्या स्कुटीवरील पुढील भागात प्लास्टीकच्या सफेद रंगाची गोणी भरुन ठेवल्याचे दिसून आले. त्यामुळे अधिकारी सदर स्कुटीच्या दिशेने गेले व स्कूटीवरील इसमास त्याचे नाव गांव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव लक्ष्मणगिरी मंगलगिरी गोस्वामी असे असल्याचे सांगून सदर गोणीमध्ये प्लास्टीकच्या कॅनमध्ये केरोसीन भरुन विक्रीसाठी आणल्याचे सांगीतले. या इसमास ताब्यात घेत असतांनाच बसमध्ये असलेला हानीफ नावाचा इसम पळून गेला.

रतनलाल मोतीलाल जाट याच्याकडे विचारणा केली असता, तो राजस्थान राज्यातील रहीवाशी असून, दिनांक ०४/०५/२०११ पासून नविन श्रीनाथ ट्रॅव्हल्सच्या बस क्रमांक आरजे-३०-पीए-०९९९ वर वाहन चालक म्हणून काम करीत आहे व त्याकरीता त्याला दरमहा रुपये २०००/- इतका पगार देण्याचे मालकाने कबूल केले आहे. दिनांक ०६/०५/२०११ रोजी सदर बसमध्ये प्रवासी घेवून दुपारी ०२:०० वाजता राजस्थानवरुन निघून दिनांक ०७/०५/२०११ रोजी सर्व प्रवाशांना मुंबईमध्ये सोडून सकाळी ०८:०० वाजता बस श्लोका हॉटेलच्या समोर, मुलूंड (प) या ठिकाणी आणून उभी केल्याचे व नविन श्रीनाथ ट्रॅव्हल्सचे मालक सुशिल शर्मा यांच्या सांगण्यावरुन बुकींग क्लार्क नरेंद्रकुमार मांगीलाल तेली (कुमार) यांनी त्यांच्या भ्रमणध्वनीवरुन लक्ष्मणगिरी मंगलगिरी गोस्वामी यांना कॉल करुन बसच्या इंधन टाकीमध्ये टाकण्यासाठी केरोसिन घेवून येण्यास सांगितल्या नंतर प्रथमतः लक्ष्मणगिरी मंगलगिरी गोस्वामी यांचा सहकारी हानिफ हा दोन चाकी ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीव्ही-५४१ वरुन २० लिटर्स क्षमतेच्या २ कॅनमधून एकूण ४० लिटर्स निळे केरोसीन घेवून आल्याचे व सदरचे केरोसीन बसच्या इंधन टाकीमध्ये टाकल्याचे व त्यांनतर त्यांनी परत एकदा त्याच स्कूटीवरुन काळ्या रंगाच्या २० लिटर्स क्षमतेच्या कॅनमध्ये भरुन ते कॅन सफेद रंगाच्या प्लास्टीकच्या गोणीमध्ये भरुन सदर बसच्या जवळ येवून स्कूटी उभी करुन ते कॅन गोणीसह घेवून तो बसमध्ये आला असल्याचे पंचासमक्ष सांगीतले व तसा लेखी जबाब नोंदवून घेतला.

नरेंद्रकुमार मांगीलाल तेली (कुमार) याच्याकडे विचारणा केली असता, तो नविन श्रीनाथ ट्रॅव्हल्सच्या कार्यालयामध्ये बुकिंग क्लार्क म्हणून काम करीत आहे. दिनांक ०७/०५/२०११ रोजी बसच्या चालका समवेत सकाळी ०८:०० वाजता बस श्लोका हॉटेलच्या समोर, मुलूंड (प) या ठिकाणी घेवून केल्याचे व नविन श्रीनाथ ट्रॅव्हल्सच मालक सुशिल शर्मा यांच्या सांगण्यावरुन भ्रमणध्वनीवरुन लक्ष्मणगिरी मंगलगिरी गोस्वामी यांना बसच्या इंधन टाकीमध्ये टाकण्यासाठी केरोसिन घेवून येण्यास सांगितल्यानंतर त्याचा सहकारी हानीफ हा दोन चाकी ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीव्ही-५४१ वरुन २० लिटर्स क्षमतेच्या २ कॅनमधून एकूण ४० लिटर्स निळे केरोसीन घेवून येवून सदर बसच्या आतील भागात असलेली स्लिपर कोचवरील गादी वरती करुन त्या ठिकाणी प्लास्टीकचा पाईप जोडून लोखंडी नळकांडयाद्वारे इंधन टाकीमध्ये सदरचे ४० लिटर्स केरोसीन हानिफ व चालकाचे

मदतीने टाकल्याचे व त्यांनतर त्यांनी परत एकदा त्याच स्कूटीवरुन काळ्या रंगाच्या २० लिटर्स क्षमतेच्या कॅनमध्ये भरुन ते कॅन सफेद रंगाच्या प्लास्टीकच्या गोणीमध्ये भरुन सदर बसच्या जवळ येवून स्कूटी उभी करुन ते कॅन गोणीसह घेवून तो बसमध्ये आला असल्याचे पंचासमक्ष सांगीतले व तसा लेखी जबाब नोंदवून घेतला.

तदनंतर दरम्यानच्या काळात ताब्यात घेतलेला इसम लक्ष्मणगिरी मंगलगिरी गोस्वामी याच्याकडे चौकशी केली असता, तो निळे केरोसीनची अवैध मार्गाने खरेदी/विक्री करणे हा त्याचा व्यवसाय असल्याचा सांगून दिनांक ०७/०५/२०११ रोजी नरेंद्रकुमार मांगीलाल तेली (कुमार) याच्या सांगण्यावरुन त्याने त्याचा सहकारी हानीफ यास त्याच्या दोन चाकी ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीव्ही-५४१ वरुन ६० लिटर्स निळे केरोसीन आणून श्लोका हॉटेलच्या समोर, मुलूंड (प) या ठिकाणी असलेल्या सदर बसच्या इंधन टाकीमध्ये टाकण्यासाठी सांगितल्याचे व त्याच वेळेस तो सुध्दा त्या ठिकाणी ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीपी-६५२६ वरुन ३० लिटर्स केरोसीन घेवून आल्याचे पंचासमक्ष सांगीतले व तसा लेखी जबाब नोंदवून घेतला.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबधितांनी संगनमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शासन अनुदानीत दराने फक्त स्वयंपाकासाठीच शिधापत्रिकेवर वितरीत होणारे निळे केरोसिन स्वत:च्या फायद्यासाठी अवैध मार्गाने प्राप्त करुन त्याची विक्री व बेकायदेशीररित्या साठवणूक व वाहतूक करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबधिताविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, व ९ (२) दि मुंबई रेशनिंग एरिया शेडयुल्ड कमोडीटीज (रेग्यूलेशन ऑफ डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर १९८६ चे कलम ४, ५, ६ ७ व ८ (३) दि केरोसिन (रिस्ट्रीक्शन ऑन युज ॲण्ड फिक्सेशन ऑफ सिलिंग प्रायजेस) ऑर्डर, १९९३ चे कलम ३ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द मुलूंड पोलिस ठाणे, मुंबई येथे स्था.ख.क्र. ११५५/२०११ दि.०७/०५/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | प्रवासी बस क्रमांक आरजे-३०-पीए-०९९९ | १ नग | १५,००,०००/- |
| २ | शासन नियंत्रीत दराच्या निळ्या केरोसीनची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात आलेली ॲक्टीव्हा स्कूटी क्र. एमएच-०४-डीव्ही-५४१ | १ नग | ४०,०००/- |
| ३ | शासन नियंत्रीत दराच्या निळ्या केरोसीनची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात आलेली ॲक्टीव्हा स्कूटी क्र. एमएच-०४-डीपी-६५२६ | १ नग | ४०,०००/- |
| ४ | ३० लि क्षमतेच्या काळ्या रंगाच्या प्लास्टीकच्या कॅनमधील निळे केरोसीन | ३० लि. | १,४३०/- |
| ५ | २० लि क्षमतेच्या काळ्या रंगाच्या प्लास्टीकच्या कॅनमधील निळे केरोसीन | २० लि. | ८१०/- |
| ४ | इंधन टाकीमध्ये केरोसीन टाकण्यासाठी वापरात असलेले पाईप सह लोखंडी नरसाळे | १ नग | २००/- |
| | | एकुण | १५,८२,४४०/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी केलेली असून, मुलूंड पोलिस स्टेशन, मुंबई येथे स्थानिक गुन्हा नोंद क्र. ११५५/२०११ दि.०७/०५/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेला उपरोक्त मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये ? याबाबत वाचा क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दि. ०२/०६/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०२/०६/२०११ रोजीच्या सुनावणीस आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलीस अधिकारी उपस्थित राहीले नाहीत. सबब, सदरची सुनावणी स्थगित करुन पुढील सुनावणी दि. ०९/०६/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०९/०६/२०११ रोजीच्या सुनावणीस ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीव्ही-५४१ चे मालक कैलाश लक्ष्मणगिरी गोस्वामी, ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीपी-६५२६ चे मालक दिपक लक्ष्मणगिरी गोस्वामी, लक्ष्मणगिरी मंगलगिरी गोस्वामी तसेच हनीफ खान उपस्थित राहीले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ३ अन्वये त्यांचे स्वतंत्र लेखी निवेदने सादर केले. सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलीस अधिकारी उपस्थित राहीले नाहीत. सबब, त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी म्हणून पुढील सुनावणी दि.२२/०६/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २२/०६/२०११ रोजीच्या सुनावणीस इतर आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलीस अधिकारी उपस्थित राहीले नाहीत. तद्नंतर पुढील सुनावणी दि.०२/०७/२०११ रोजी ठेवण्यात आली. दिनांक ०२/०७/२०११ रोजीच्या सुनावणीसही इतर आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलीस अधिकारी उपस्थित राहीले नाहीत. सबब, त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी म्हणून पुढील सुनावणी दि.१८/०७/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १८/०७/२०११ व दि.०६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस बस क्रमांक आरजे-३०-पीए-०९९९ तसेच श्रीनाथ ट्रॅव्हल्सचे मालक सुशिलकुमार जोशी, बुकींग क्लार्क नरेंद्रकुमार मांगीलाल तेली (कुमार) व बस क्रमांक आरजे-३०-पीए-०९९९ चे चालक रतनलाल मोतीलील जाट उपस्थित राहीले. तथापी, सदरच्या दोन्ही सुनावण्या प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आल्या. तथापी, त्यांनी त्यांचे लेखी निवेदन वाचावे क्र. ४ अन्वये टपालामार्फत या कार्यालयास सादर केले. सबब, पुढील सुनावणी दि.१७/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १७/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलीस अधिकारी उपस्थित राहीले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि.३०/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली. दिनांक ३०/०८/२०११ रोजीची सुनावणी प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली व पुढील सुनावणी दि.१४/०९/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १४/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलीस अधिकारी उपस्थित राहीले नाहीत. सबब, त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याकरीता अंतिम संधी म्हणून पुढील सुनावणी दि.२६/०९/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २६/०९/२०११ रोजीच्या सुनावणीसही इतर आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलीस अधिकारी उपस्थित राहीले नाहीत. 0005

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखीव ठेवण्यात आले.

**युक्तिवाद**

सुनावणीस उपस्थित ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीव्ही-५४१-चे मालक कैलाश लक्ष्मणगिरी गोस्वामी यांनी सादर केलेल्या निवेदनात, ते सदर ॲक्टीव्हा स्कूटीचे मालक असून, ही गाडी त्याच्या मित्राने कामाकरीता मागीतली असता, त्याने ती मित्राला दिली होती. त्याच्या मित्राने केरोसीनची वाहतुक करीत असताना गाडी पकडल्याचे त्याला समजले. गाडी सोबत सापडलेल्या मालाशी त्याचा काहीही संबंध नसून, तो माल त्याचा नाही. तरी सदर आरोपातून मुक्त करुन जप्त स्कूटी त्याला परत मिळावी असे नमुद केले आहे.

सुनावणीस उपस्थित ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीपी-६५२६-चे मालक दिपत लक्ष्मणगिरी गोस्वामी यांनी सादर केलेल्या निवेदनात, ते सदर ॲक्टीव्हा स्कूटीचे मालक असून, ही गाडी त्याच्या मित्राने घरगुती कामाकरीता मागीतली असता, त्याने ती मित्राला दिली होती. त्याच्या मित्राने केरोसीनची वाहतुक करीत असतांना पोलिसांनी गाडी पकडल्याचे त्याला समजले. गाडी सोबत सापडलेल्या मालाशी त्याचा काहीही संबंध नसून, तो माल त्याचा नाही. तरी सदर आरोपातून मुक्त करुन जप्त स्कूटी त्याला परत मिळावी असे नमुद केले आहे.

सुनावणीस उपस्थित लक्ष्मणगिरी मंगलगिरी गोस्वामी यांनी सादर केलेल्या निवेदनात, त्याचेकडे मिळालेले केरोसीन रतनलाल जाट हे त्याच्या ओळखीच्या इसमाचे असून, त्याने घरात वापरण्याकरीता केरोसीन घेऊन येण्याबाबत त्याला सांगितले. त्याप्रमाणे त्याने डफीन रोड झोपडपट्टीतील स्त्रियांकडून ३० लिटर केरोसीन खरेदी केले. सदरचे केरोसीन हॉटेल श्लोकासमोर उभे असलेले रतनलाल मोतीलील जाट यास देण्याकरीता तो गेला असता, पोलीसांनी त्याला पकडले. हे जप्त केरोसीन बसमध्ये टाकणार होते, हे त्याला माहित नाही. तसेच या गुन्ह्याशी त्याचा काहीही संबंध नसल्याचे नमुद केले आहे.

सुनावणीस उपस्थित हनीफ खान यांनी सादर केलेल्या निवेदनात, त्याच्याकडे गाडी साफसफाई करणाऱ्या व्यक्तिने त्याला केरोसीन बाबत विचारले असता, केरोसीन भेटले तर देतो असे त्याने त्या व्यक्तिस सांगीतले. त्याप्रमाणे तो झोपडपट्टीतील स्त्रियांकडून केरोसीन खरेदी करुन त्या व्यक्तिस देण्याकरीता गेला असता, पोलीसांनी त्याला पकडले. हे जप्त केरोसीन बसमध्ये टाकणार होते, हे त्याला माहित नाही. तसेच या गुन्ह्याशी त्याचा काहीही संबंध नसल्याचे नमुद केले आहे.

बस क्रमांक आरजे-३०-पीए-०९९९ तसेच श्रीनाथ ट्रॅव्हल्सचे मालक सुशिलकुमार जोशी यांनी टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनात, नोटीसमध्ये नमुद केल्याप्रमाणे त्याचे आडनाव शर्मा नसून जोशी आहे. मुलूंड पोलीस स्टेशनमध्ये जप्त केलेली बस क्र.आरजे-३०-पीए-०९९९ तसेच नविन श्रीनाथ ट्रॅव्हल्सचे मालक तो स्वत: आहे.

सदरची बस प्रवासी वाहतुक करीत असून, राजस्थान ते मुंबई दररोज ये जा करीत असते. नेहमीप्रमाणे दिनांक ६.५.२०११ रोजी राजस्थान वरुन मुंबईला जाण्यासाठी बस निघाली. त्यापूर्वी राजस्थानमध्येच सदर बसच्या इंधन टाकीमध्ये डिझेल भरले (टाकी पूर्ण केली) होते. घटनेच्या दिवशी म्हणजेच दि. ७.५.२०११ रोजी तो राजस्थानमध्येच होता. त्याच्या बसमध्ये चालकाने केरोसीन भरले म्हणून बस जप्त केली असल्याचे त्याला फोनवरुन समजले. त्यामुळे चालकाने केरोसीन कोठूण आणले, कशासाठी भरले व का भरले हे त्याला माहित नाही. झालेल्या घटनेशी त्याचा काहीही संबंध नाही. नोटीसमध्ये नमुद केल्याप्रमाणे त्याने चालकाला केरोसीन भरण्याबाबत कोणतीही सुचना दिलेली नव्हती. कारण राजस्थान ते मुंबई व मुंबई ते राजस्थान जाण्या येण्याकरीता बसची इंधन टॅंक डिझेलने पूर्ण भरली होती. जप्त केलेल्या बसच्या व्यवसायावरच त्याच्या कुटूबाचे जीवनमान अवलंबून असून, बस जप्त केल्याने त्यांच्या व्यवसायावर व आर्थिक परिस्थितीवर परिणाम झालेला आहे. या घटनेशी त्याचा कोणताही संबध नसल्याने या गुन्ह्यातून मुक्त करावे, असे नमुद केले आहे.

बस क्रमांक आरजे-३०-पीए-०९९९ चे चालक रतनलाल मोतीलाल जाट यांनी टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनात, जप्त केलेल्या सदर बसवर तो ड्रायव्हर म्हणून घटनेच्या दोन दिवसापूर्वी पासून काम करीत आहे. बस मालकाने त्याला २०००/- महीना इतका पगार देण्याचे कबूल केले. ही बस राजस्थान ते मुंबई दररोज प्रवासी वाहतुक करीत असते. दिनांक ६.५.२०११ रोजी राजस्थान वरुन मुंबईला जाण्यासाठी बस निघाली. त्यापूर्वी बस मालकाने राजस्थानमध्येच सदर बसची पुर्ण इंधन टाकीमध्ये डिझेल भरले होते. घटनेच्या दिवशी म्हणजेच दिनांक ७.५.२०११ रोजी मुंबईला प्रवासी सोडल्यानंतर तो राजस्थानला परत जाणार होता. परंतु त्याच्या घरी केरोसीनची गरज असल्याने त्याने राजस्थानला नेण्याकरीता ३० लिटर्स केरोसीन घेतले. हे केरोसीन त्याने बसच्या इंधन टाकीमध्ये टाकण्याकरीता घेतले नसून, त्याच्या स्वत:च्या घरी राजस्थानमध्ये नेण्याकरीता खरेदी केले होते. केरोसीन खरेदी केल्यानंतर परत जात असतांना अधिकाऱ्यांनी त्याला पकडले व बस जप्त केली. राजस्थान ते मुंबई व मुंबई ते राजस्थान जाण्या-येण्याकरीता बसची इंधन टॅंक डिझेलने पूर्ण भरली असल्याने त्यामध्ये केरोसीन टाकण्याची आवश्यकता नव्हती. तो बसवर दोन दिवसापूर्वीच नोकरीवर असल्याने व पहील्यांदाच मुंबईला बस घेवून आला असल्याने त्याला याबाबत काहीही माहिती नसल्याचे नमुद केले आहे.

बुकींग क्लार्क नरेंद्रकुमार मांगीलाल तेली (कुमार) यांनी टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनात, नविन श्रीनाथ ट्रव्हल्स यांच्या जप्त केलेल्या सदर बस क्र.आरजे-३०-पीए-०९९९ वर तो बुकींग क्लार्क म्हणून घटनेच्या एक आठवड्यापूर्वी पासून काम करीत आहे. बस मालकाने त्याला ५०००/- महीना इतका पगार देण्याचे कबूल केले. ही बस राजस्थान ते मुंबई दररोज प्रवासी वाहतुक करीत असते. प्रवासादरम्यान प्रवाशांकडून बसमध्ये तिकीट वाटपाचे काम तो करीत असतो. दिनांक ६.५.२०११ रोजी राजस्थान वरुन मुंबईला जाण्यासाठी बस निघाली. त्यापूर्वी बस मालकाने राजस्थानमध्येच सदर बसच्या पुर्ण इंधन टाकीमध्ये डिझेल भरले होते. घटनेच्या दिवशी म्हणजेच दि. ७.५.२०११ रोजी मुंबईला प्रवासी सोडल्यानंतर तो राजस्थानला परत जाणार होता. बसचे ड्रायव्हर रतनलाल

मोतीलाल जाट यांनी त्यांचे राजस्थान येथील घरी केरोसीन न्यायचे असल्याचे त्याला सांगीतले. त्याप्रमाणे ड्रायव्हरने त्याच्या घरी राजस्थानला नेण्याकरीता ३० लिटर्स केरोसीन खरेदी केले. हे केरोसीन त्याने बसच्या इंधन टाकीमध्ये टाकण्याकरीता घेतले नव्हते. केरोसीन खरेदी केल्यानंतर परत जात असतांना अधिकाऱ्यांनी त्याला पकडले व बस जप्त केली. राजस्थान ते मुंबई व मुंबई ते राजस्थान जाण्या-येण्याकरीता बसची इंधन टँक डिझेलने पूर्ण भरली असल्याने त्यामध्ये केरोसीन टाकण्याची आवश्यकता नसल्याचे नमुद केले आहे.

तपासी पोलीस अधिकारी यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेसी संधी देवूनदेखील ते एकाही सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. तसेच त्यांचे लेखी म्हणणेही सादर केलेले नाहीत.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी दि.०७/०५/२०१० रोजी या कार्यालयास मिळालेल्या बातमीनुसार या कार्यालयाच्या भरारी पथकातील अधिकारी पंचासह दुपारी ठिक १२:३० वाजता श्लोका हॉटेलच्या समोर, एल.बी.एस. रोड, मुलुंड (प) मुंबई या ठिकाणी पोहचले असता, सदर ठिकाणी श्लोका हॉटेलच्या समोर मुंबईच्या दिशेने नविन श्रीनाथ ट्रॅव्हल्स या नावाने असलेली एक प्रवाशी वाहतूक करणारी बस क्र.आरजे-३०-पीए-०९९९ उभी होती. सदर बसच्या समोर ॲक्टीव्हा स्कूटी क्र.एमएच-०४-डीव्ही-५४१ उभी होती. अधिकारी यांनी पंचासह बसमध्ये प्रवेश केला असता, बसमध्ये तीन इसम उपस्थित होते व त्यांच्या बाजूलाच एका प्लास्टीकच्या गोणीमध्ये २० लिटर्स क्षमतेचे काळ्या रंगाचे प्लास्टीकचे कॅन असल्याचे व स्लिपर कोचवरील गादी वरती केल्याची व आतील बाजुचे इंधन टाकीमध्ये प्लास्टीकच्या पाईपला जोडलेले लोखंडी नरसाळे लावल्याचे दिसून आले. बसमध्ये उपस्थित इसमांनी त्यांची नावे नरेंद्रकुमार मांगीलाल तेली (कुमार), रतनलाल मोतीलाल जाट व हानीफ अशी असल्याचे सांगीतले. त्याचवेळेस बसच्या समोर आणखी एक ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीपी-६५२६ वरुन एक इसम आला व त्याच्या स्कुटीवरील पुढील भागात प्लास्टीकच्या सफेद रंगाची गोणी भरुन ठेवल्याचे दिसून आले. त्यामुळे अधिकारी सदर स्कुटीच्या दिशेने गेले व स्कूटीवरील इसमाने त्याचे नाव लक्ष्मणगिरी मंगलगिरी गोस्वामी असे सांगून सदर गोणीमध्ये प्लास्टीकच्या कॅनमध्ये केरोसीन भरुन विक्रीसाठी आणल्याचे सांगीतले. या इसमास ताब्यात घेत असतांनाच बसमध्ये असलेला हानीफ नावाचा इसम पळून गेला. रतनलाल मोतीलाल जाट याच्याकडे विचारणा केली असता, तो राजस्थान राज्यातील रहीवाशी असून, दिनांक ०४/०५/२०११ पासून नविन श्रीनाथ ट्रॅव्हल्सच्या बस क्रमांक आरजे-३०-पीए-०९९९ वर वाहन चालक म्हणून काम करीत आहे व त्याकरीता त्याला दरमहा रुपये २०००/- इतका पगार देण्याचे मालकाने कबूल केले आहे. दिनांक ०६/०५/२०११ रोजी सदर बसमध्ये प्रवासी घेवून दुपारी ०२:०० वाजता राजस्थानवरुन निघून दिनांक ०७/०५/२०११ रोजी सर्व प्रवाशांना मुंबईमध्ये सोडून सकाळी ०८:०० वाजता

0008 बस श्लोका हॉटेलच्या समोर, मुलूंड (प) या ठिकाणी आणून उभी केल्याचे व नविन श्रीनाथ ट्रॅव्हल्सचे मालक सुशिल शर्मा यांच्या सांगण्यावरुन बुकींग क्लार्क नरेंद्रकुमार मांगीलाल तेली (कुमार) यांनी त्यांच्या भ्रमणध्वनीवरुन लक्ष्मणगिरी मंगलगिरी गोस्वामी यांना कॉल करुन बसच्या इंधन टाकीमध्ये टाकण्यासाठी केरोसिन घेवून येण्यास सांगितल्या नंतर प्रथमत: लक्ष्मणगिरी मंगलगिरी गोस्वामी यांचा सहकारी हानिफ हा दोन चाकी ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीव्ही-५४१ वरुन २० लिटर्स क्षमतेच्या २ कॅनमधून एकूण ४० लिटर्स निळे केरोसीन घेवून आल्याचे व सदरचे केरोसीन बसच्या इंधन टाकीमध्ये टाकल्याचे व त्यांनतर त्यांनी परत एकदा त्याच स्कूटीवरुन काळ्या रंगाच्या २० लिटर्स क्षमतेच्या कॅनमध्ये भरुन ते कॅन सफेद रंगाच्या प्लास्टीकच्या गोणीमध्ये भरुन सदर बसच्या जवळ येवून स्कूटी उभी करुन ते कॅन गोणीसह घेवून तो बसमध्ये आला असल्याचे पंचासमक्ष सांगीतले व तसा लेखी जबाब नोंदवून घेतला. नरेंद्रकुमार मांगीलाल तेली (कुमार) याच्याकडे विचारणा केली असता, तो नविन श्रीनाथ ट्रॅव्हल्सच्या कार्यालयामध्ये बुकिंग क्लार्क म्हणून काम करीत आहे. दिनांक ०७/०५/२०११ रोजी बसच्या चालका समवेत सकाळी ०८:०० वाजता बस श्लोका हॉटेलच्या समोर, मुलूंड (प) या ठिकाणी घेवून केल्याचे व नविन श्रीनाथ ट्रॅव्हल्सचे मालक सुशिल शर्मा यांच्या सांगण्यावरुन भ्रमणध्वनीवरुन लक्ष्मणगिरी मंगलगिरी गोस्वामी यांना बसच्या इंधन टाकीमध्ये टाकण्यासाठी केरोसिन घेवून येण्यास सांगितल्यानंतर त्याचा सहकारी हानीफ हा दोन चाकी ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीव्ही-५४१ वरुन २० लिटर्स क्षमतेच्या २ कॅनमधून एकूण ४० लिटर्स निळे केरोसीन घेवून येवून सदर बसच्या आतील भागात असलेली स्लिपर कोचवरील गादी वरती करुन त्या ठिकाणी प्लास्टीकचा पाईप जोडून लोखंडी नळकांडयाद्वारे इंधन टाकीमध्ये सदरचे ४० लिटर्स केरोसीन हानिफ व चालकाचे मदतीने टाकल्याचे व त्यांनतर त्यांनी परत एकदा त्याच स्कूटीवरुन काळ्या रंगाच्या २० लिटर्स क्षमतेच्या कॅनमध्ये भरुन ते कॅन सफेद रंगाच्या प्लास्टीकच्या गोणीमध्ये भरुन सदर बसच्या जवळ येवून स्कूटी उभी करुन ते कॅन गोणीसह घेवून तो बसमध्ये आला असल्याचे पंचासमक्ष सांगीतले व तसा लेखी जबाब नोंदवून घेतला. तद्नंतर दरम्यानच्या काळात ताब्यात घेतलेला इसम लक्ष्मणगिरी मंगलगिरी गोस्वामी याच्याकडे चौकशी केली असता, तो निळे केरोसीनची अवैध मार्गाने खरेदी/विक्री करणे हा त्याचा व्यवसाय असल्याचा सांगून दिनांक ०७/०५/२०११ रोजी नरेंद्रकुमार मांगीलाल तेली (कुमार) याच्या सांगण्यावरुन त्याने त्याचा सहकारी हानीफ यास त्याच्या दोन चाकी ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीव्ही-५४१ वरुन ६० लिटर्स निळे केरोसीन आणून श्लोका हॉटेलच्या समोर, मुलूंड (प) या ठिकाणी असलेल्या सदर बसच्या इंधन टाकीमध्ये टाकण्यासाठी सांगितल्याचे व त्याच वेळेस तो सुध्दा त्या ठिकाणी ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीपी-६५२६ वरुन ३० लिटर्स केरोसीन घेवून आल्याचे पंचासमक्ष सांगीतले व तसा लेखी जबाब नोंदवून घेतला. यावरुन सदर प्रवासी बस वाहन, दोन ॲक्टिव्हा स्कुटी व त्यामधील दोन प्लास्टीकच्या कॅनमधील ५० लिटर केरोसीनचा साठा जप्त करण्यात आले.

बस क्रमांक आरजे-३०-पीए-०९९९ चे चालक रतनलाल मोतीलील जाट यांनी केलेल्या खुलाशात, घटनेच्या दिवशी दि. ७.५.२०११ रोजी मुंबईला प्रवासी सोडल्यानंतर राजस्थानला परत जाणार होता. परंतु त्याच्या घरी

केरोसीनची गरज असल्याने त्याने राजस्थानला नेण्याकरीता ३० लिटर्स केरोसीन घेतले. हे केरोसीन त्याने बसच्या इंधन टाकीमध्ये टाकण्याकरीता घेतले नसून, त्याच्या स्वतःच्या घरी राजस्थानमध्ये नेण्याकरीता खरेदी केले असल्याचे नमुद केले आहे. तसेच बुकींग क्लार्क नरेंद्रकुमार मागीलाल तेली (कुमार) यांनी केलेल्या खुलाशात, बसचे ड्रायव्हर रतनलाल मोतीलाल जाट यांनी त्यांचे राजस्थान येथील घरी केरोसीन न्यायचे असल्याचे त्याला सांगीतले. त्याप्रमाणे ड्रायव्हरने त्याच्या घरी राजस्थानला नेण्याकरीता ३० लिटर्स केरोसीन खरेदी केले. हे केरोसीन त्याने बसच्या इंधन टाकीमध्ये टाकण्याकरीता घेतले असल्याचे नमुद केले आहे. तथापी, घटनेच्यावेळी बसचे चालक रतनलाल मोतीलील जाट व बुकिंग क्लार्क नरेंद्रकुमार मागीलाल तेली (कुमार) यांनी दिलेल्या जबाबात, सदर बस व नवीन श्रीनाथ ट्रव्हल्सचे मालक सुशिल शर्मा यांच्या सांगण्यावरुन बसच्या इंधन टाकीमध्ये केरोसीन टाकण्याकरीता लक्ष्मणगिरी गोस्वामी यांना केरोसीन घेवून येण्यास सांगीतले. त्यानुसार हनीफ नावाचा इसम व लक्ष्मणगिरी गोस्वामी यांनी जप्त ॲक्टीव्हा स्कूटीने केरोसीन घेवून आले असल्याचा जबाब दिला आहे. तसेच लक्ष्मणगिरी गोस्वामी यांनीही घटनास्थळी दिलेल्या जबाबात, तो अवैधमार्गाने केरोसीन खरेदी करुन ते करोसीन गरजू बस ट्रॅव्हल्सच्या व्यवसाय करणाऱ्या व्यक्तिना इंधन टाकीमध्ये वापरण्याकरीता पुरवठा करीत असल्याचे काम करतो. त्याप्रमाणे सदर जप्त प्रवासी बसच्या इंधन टाकीमध्ये वापरण्याकरीता दोन स्कुटीवरुन केरोसीन घेवून आल्याचा जबाब दिला आहे. यावरुन आरोपी यांनी घटनास्थळी दिलेला जबाब व सुनावणीच्यावेळी केलेला खुलासा मोघम स्वरुपात असून, घटनास्थळी केरोसीनने भरलेल्या दोन कॅन व बसच्या इंधन टाकीमध्ये करोसीन भरत असल्याचे आढळून आले असून, केरोसीन घेतल्याची बाबही बसचे चालक यांनी मान्य केले आहे. म्हणजेच आरोपी यांनी संबंधितांशी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शासन नियंत्रित निळे केरोसिन स्वतःच्या फायद्यासाठी अवैध मार्गाने प्राप्त करुन त्याची बेकायदेशीररित्या विक्री, साठवणूक व वाहतूक करीत असल्याचे स्पष्ट होते. सबब, जप्त करण्यात आलेले संपूर्ण एकूण ५० लिटर्स निळे केरोसिनचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेली बस क्रमांक आरजे-३०-पीए-०९९९ ही सुशिलकुमार जोशी यांचे मालकीची असल्याचे त्यांनी सादर केलेल्या निवेदनावरुन दिसून येते. तसेच त्यांनी दिलेल्या खुल्याशात, सदरची बस प्रवासी वाहतुक करीत असून, राजस्थान ते मुंबई दररोज ये-जा करीत असते. राजस्थानमध्येच सदर बसच्या इंधन टाकीमध्ये डिझेल भरले होते. घटनेच्या दिवशी म्हणजेच दि. ७.५.२०११ रोजी तो राजस्थानमध्येच होता. त्याच्या बसमध्ये चालकाने केरोसीन भरले म्हणून बस जप्त केली असल्याचे त्याला फोनवरुन समजले. त्यामुळे चालकाने केरोसीन कोठूण आणले, कशासाठी भरले व का भरले हे त्याला माहित नाही. झालेल्या घटनेशी त्याचा काहीही संबंध नाही. जप्त केलेल्या बसच्या व्यवसायावरच त्याच्या कुटूंबाचे जीवनामान अवलंबून असल्याचे नमुद केले आहे. तथापी, घटनेच्यावेळी बसचे चालक रतनलाल मोतीलील जाट व बुकिंग क्लार्क नरेंद्रकुमार मागीलाल तेली (कुमार) यांनी दिलेल्या जबाबात, सदर बस व नवीन श्रीनाथ ट्रव्हल्सचे मालक सुशिल शर्मा यांच्या सांगण्यावरुन

बसच्या इंधन टाकीमध्ये केरोसीन टाकण्याकरीता लक्ष्मणगिरी गोस्वामी याना केरोसीन घेवून येण्यास सांगीतले. त्यानुसार हनीफ नावाचा इसम व लक्ष्मणगिरी गोस्वामी यांनी जप्त ॲक्टीव्हा स्कूटीने केरोसीन घेवून आले असल्याचा जबाब दिला आहे. तसेच पथकास घटनास्थळी बसच्या इंधन टाकीमध्ये केरोसीन असल्याचे आढळून आले आहे. यावरुन बस मालकाने जाणीवपूर्वक व लालसेपोटी केरोसिनचा सर्व संबधितांशी संगणमत करुन बेकायदेशीरपणे इंधनटाकीत नियंत्रित दराने वितरीत होणारे निळे केरोसिनचा गैरवापर करुन वाहतूक करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. बस मालकाने दिलेल्या निवेदनावरुन, जरी बस मालकाच्या अपरोक्ष सदरचा गुन्हा घडला असला, तरी बस मालकाने त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचे जप्त करण्यात आलेली प्रवासी बस क्रमांक आरजे-३०-पीए-०९९९ ही तीच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास बसचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदर बस त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा बस मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या बसची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी या बसच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेली ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीव्ही-५४१ ही कैलाश लक्ष्मणगिरी गोस्वामी यांच्या मालकीची तसेच ॲक्टीवा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीव्ही-६५२६ ही दिपक लक्ष्मणगिरी गोस्वामी यांच्या मालकीची असल्याचे त्यांनी सादर केलेल्या प्रादेशीक परिवहन विभागाचे वाहन नोंदणी प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतीवरुन दिसून येते. तसेच सदर दोन्ही ॲक्टीव्हा स्कूटीच्या मालकाने सादर केलेल्या खुलाशात, सदरची स्कूटी गाडी त्यांच्या मित्राने कामाकरीता मागीतली असता, त्यांनी ती मित्राला दिली होती. त्यांच्या मित्राने केरोसीनची वाहतुक करीत असतांना गाडी पकडल्याचे त्याला समजले. गाडी सोबत सापडलेल्या मालाशी त्यांचा काहीही संबंध नसून, तो माल त्यांचा नाही. तरी सदर आरोपातून मुक्त करुन जप्त स्कूटी त्याला परत मिळावे असे नमुद केले आहे. तथापी, लक्ष्मणगिरी गोस्वामी यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात, सदर जप्त दोन्ही ॲकिटव्हा स्कूटीपैकी एका स्कूटीवर त्याने स्वत: तर दुसऱ्या स्कूटीवर त्याचा सहकारी हनीफ याने केरोसीनने भरलेले कॅन घटनास्थळी आणले असल्याचा जबाब दिला आहे. तसेच घटनास्थळी दोन्ही स्कूटी व केरोसीनने भरलेले कॅन आढळून आले आहे. यावरुन शासन नियंत्रित निळे केरोसीनच्या अवैध वाहतुकीकरीता सदर दोन्ही ॲक्टीव्हा स्कूटीचा गैरवापर केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. जप्त दोन्ही ॲक्टीव्हा स्कूटीच्या मालकाने दिलेल्या निवेदनावरुन, जरी स्कूटी मालकांच्या अपरोक्ष सदरचा गुन्हा घडला असला तरी, मालक या नात्याने त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचे जप्त करण्यात आलेली ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीव्ही-५४१ व ॲक्टीवा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीव्ही-६५२६ या त्यांच्या बाजारमुल्या एवढी प्रत्येकी रक्कम

भरण्यास स्कूटीचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरच्या स्कूटी त्यांच्या मालकांस परत करण्याच्या अथवा स्कूटी मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या स्कूटीची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये मुलूंड पोलिस स्टेशन, मुंबई येथे स्थानिक गुन्हा नोंद क्र. ११५५/२०११ दि.०७/०५/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) जप्त करण्यात आलेला संपूर्ण निळे केरोसीनचा एकुण ५० लिटर साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेले सदरचे निळे केरोसिन उपनियंत्रक शिधावाटप, ई - परिमंडळ कार्यालय, वडाळा यांचे मदतीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांस, पोलीसांनी नियंत्रीत दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) जप्त करण्यात आलेली प्रवासी बस क्रमांक आरजे-३०-पीए-०९९९ ही शासनजमा करण्यात येत आहे. सदर बस वाहन त्याच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास बसचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहन त्याच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी बसच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी. अथवा वाहन मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनाची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहने लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

४) जप्त करण्यात आलेली ॲक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीव्ही-५४१ व ॲक्टीवा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीव्ही-६५२६ हे दोन्ही वाहन शासनजमा करण्यात येत आहे. सदर दोन्ही वाहन त्यांच्या प्रत्येकी बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास त्यांचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहन त्यांच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. अथवा वाहन मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहने लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

५) जप्त करण्यात आलेले पाईपसह एक लोखंडी नरसाळे व रिकामे दोन प्लास्टीक कॅन इ. वस्तुंची पोलसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) प्रवासी बस क्र. आरजे-३०-पीए-०९९९ चे मालक
२) अॅक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीव्ही-५४१ चे मालक
३) अॅक्टीव्हा स्कूटी क्रमांक एमएच-०४-डीपी-६५२६ चे मालक
४) नरेंद्रकुमार मांगीलाल तेली (कुमार), बुकींग क्लार्क
५) बस क्रमांक आरजे-३०-पीए-०९९९ चे चालक, रतनलाल मोतीलाल जाट
६) हानीफ
७) लक्ष्मणगिरी मंगलगिरी गोस्वामी
८) नविन श्रीनाथ ट्रॅव्हल्सचे मालक, सुशिल शर्मा (जोशी)
(वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मुलूंड पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मुलूंड पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, ई- परिमंडळ, वडाळा यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.

५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.